## घटक – २

# भाषेचे स्वरूप, व्याख्या आणि वैशिष्ट्ये

### २.० उद्दिष्टे

१. भाषा म्हणजे काय समजेल.

२. भाषेच्या व्याख्या आणि वैशिष्ट्ये समजतील.

३. भाषेचे स्वरूप समजेल.

४. भाषा समाजव्यवहाराचे साधन असल्याचे स्पष्ट होईल.

५. सी. एफ. हॉकेटने सांगितलेली भाषेची सात वैशिष्ट्ये समजतील.

६. भाषिक व भाषेतर संप्रेषणाचे स्वरूप माहिती होईल.

### २.१ प्रास्ताविक

भाषा मानवनिर्मित महत्त्वाचा सामाजिक आविष्कार आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रामध्ये भाषेचा उपयोग अनिवार्य असून, भाषा मानवी संपर्काचे महत्त्वाचे साधन आहे. मानवाच्या सामाजिक प्रक्रियेमध्ये व सर्व क्षेत्रातील प्रगतीच्या केंद्रस्थानी भाषा आहे. भाषा संपर्क प्रक्रियेमध्ये भाषेबरोबर अन्य माध्यमेही आहेत. हावभाव, चित्रे, खुणा इत्यादी बाबींचा भाषा म्हणून उपयोग करता येतो. पण या स्वरूपाच्या भाषिक व्यवहाराला मर्यादा असतात. तर ध्वनिरूप भाषिक व्यवहार अत्यंत प्रभावी असतो. भाषा ध्वनिरूपातून व्यक्त होते तेव्हा ती सर्वस्पर्शी आणि सर्वव्यापी असते. भाषा संप्रेषणाचे, संवादाचे महत्त्वाचे साधन म्हणूनच कार्य करत असते. उदा. माहिती, ज्ञान, विचार, भावना यांची देवाण-घेवाण भाषेच्या माध्यमातूनच करता येते. हे भाषेचे मुलभूत कार्य आहे.

आधुनिक भाषाविज्ञानात भाषेच्या संबंधाने विविध संकल्पना मांडलेल्या आहेत. त्या समजून घेणे. भाषेच्या व्याख्या, स्वरूप आणि वैशिष्ट्ये इत्यादींचा विचार येथे जाणिवपूर्वक करावयाचा आहे.

**भाषा म्हणजे काय ?**

'भाषा' ही संकल्पना संमिश्र आहे. तोंडातून शब्दही न काढता भाषिक संप्रेषण घडते. या भाषेला मूक भाषा वा हावभावाची भाषा म्हणता येते. वाहतूक पोलिसांचे हातवारे संदेशवहन घडवत असते. संगणकाची भाषा, लाल-हिरव्या दिव्यांची भाषा इत्यादी शब्दप्रयोग भाषेबाबत योजता येतात. 'भाषा' हा



Scanned with OKEN Scanner

शब्द संकेताची पद्धत या अर्थाने योजिलेला आहे. संकेतानुसार व्यवस्था ठेवली जाते. त्या माध्यमातून विनिमय घडत असतो. उदाहरणार्थ, धोका : लाल रंग, ध्वज : प्राणी, पक्षी, रंग, चित्रे, कापड, वस्तू इत्यादी विविध माध्यमे संकेतासाठी योजली जातात.

भाव-भावना, आचारविचार व्यक्त करण्यासाठी हावभावाच्या भाषेचा आधार घेतला जातो. शिट्टी वाजविणे, हात दाखविणे, जांभई देणे, पाय आपटणे, टाळी वाजवणे, हसणे इत्यादी मानवी हावभावांची भाषा असते. या स्वरूपाच्या भाषांत व्यवहाराना हावभावाची भाषा म्हणतात. तर मुखावाटे ध्वनी निर्मितीच्या माध्यमातून बोलली जाणारी भाषा ध्वनिच्या अर्थपूर्ण संरचनेची भाषा असते. या स्वरूपाच्या भाषेचे मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान आहे.

मानव आणि मानवेतर प्राणी या दोहोंची स्वतःची भाषा व्यवस्था आहे. पण मानवेतर प्राण्यापेक्षा मानवाची भाषा अर्थदृष्ट्या आणि व्यवहारदृष्ट्या प्रगत आहे. मानवाला अन्य प्राण्यापेक्षा हात व भाषा ही दोन महत्त्वाची साधने उपलब्ध असल्यामुळे तो अन्य प्राण्यांच्या तुलनेत श्रेष्ठ व प्रगत आहे. भाषेचा अभाव असता तर मानव अन्य प्राण्यांप्रमाणे जीवन जगताना पहावयास मिळाला असता. भाषा हे मानवाच्या प्रगतीचे महत्त्वाचे साधन असल्याचे यावरून स्पष्ट होते. एकाने व्यक्त केलेल्या भावना, गरजा आणि इच्छा दुसऱ्यापर्यंत यशस्वीपणे पोहोचविण्याचे कार्य भाषेमुळे साध्य होते. यामुळे सामाजिक जीवन सुलभ झालेले आहे. मानवी समाजातील प्रगती, श्रमविभाजन आणि परिस्थितीनुसार सामोरे जाण्याचा मानवी स्वभाव या सर्वामागील कारण भाषाव्यवस्थाच आहे.

भाषा मानवी व्यवहारामध्ये दुधारी शस्त्राप्रमाणे कार्य करते. सभ्य-असभ्य, खरे-खोटे, श्लील-अश्लील इत्यादी स्वरूप व्यक्त होत असते. भाषेमुळे चांगलेही कार्य साधते, तर भीषण हत्याकांडही भाषेच्या वापरातून घडल्याची उदाहरणे पहावयास मिळतात. भाषा मानवाला एकत्र आणते. भाषेमुळेच मानववर्ग विभागला देखील जातो. हे जरी भाषेतून घडत असले तरी भाषेची गरज महत्त्वाची आहे. भाषा मानवी संवादाचे प्रभावी माध्यम असल्यामुळे तिची अनिवार्यता महत्त्वाची आहे.

भाषेची व्याप्ती आणि विस्तार व्यमिश्र स्वरूपाचा असतो. इंग्रजी, रशियन या भाषा बोलणाऱ्यांची संख्या जगभरात विपूल आहे. तर मराठी लॅपिश यासारख्या विविध भाषा जगभरात बोलणाऱ्यांची संख्या मर्यादित पहावयास मिळते. तर भाषेचा संबंध धर्माशीही जोडलेला पहावयास मिळतो. उदाहरण म्हणून संस्कृत भाषेचा विचार करता ही भाषा धर्मविधी, कार्य इत्यादीमध्ये योजली जाते. पण व्यवहारामध्ये तिचा वापर केला जात नाही. यावरून भाषेची व्याप्ती अतिव्याप्तही दिसते आणि अतिमर्यादितही पहावयास मिळते.

भाषिक लक्षणाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ती भाषागणिक बदलतात. तरीही त्यांच्यात भौगोलिकदृष्ट्या साधर्म्य आढळते. हे लक्षणाचे महत्त्वाचे विशेष म्हणून पहावे लागेल. उदाहरणार्थ, भारतातील विविध भाषेमध्ये 'मूर्धन्य' ध्वनीचा विशेष उपयोग केलेला आढळतो. बाल्कन राष्ट्रामधील



Scanned with OKEN Scanner

भाषेमध्ये 'निश्चयार्थी' उपपद शेवटी येते. अतिपूर्व देशांमधील भाषामध्ये 'ल्' व 'ळ्' यामध्ये फरक आढळत नाही. या स्वरूपात भाषेतील भाषागणिक लक्षणाचे विवेचन श्री. न. गजेंद्रगडकर यांनी लिहिले आहे.

**भाषेच्या व्याख्या**

भाषा आणि भाषिक व्यवहार याबाबतचा अभ्यास भाषा-अभ्यासकांच्या अभ्यासाचा, चिंतनाचा विषय आहे. सामान्य माणसांना याबाबतचा विचार पडत नसतो. त्यांना या स्वरूपाचे प्रश्न पडण्यापूर्वीच भाषा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होऊन जाते. मानव जन्माबरोबर भाषा शिकण्याची प्रक्रिया सुरू होते. ही शिकण्याची क्षमता नैसर्गिक स्वरूपाची असते. आपल्या परिसरातील भाषा संस्कृती संकेतासह आत्मसात केली जाते. भाषा निर्मितीबाबत मानवाला सातत्याने प्रश्न पडत आलेले आहे. आपल्या चिंतनातून, विचारातून, निरीक्षणातून आणि अनुभवातून भाषाविषयक विचार मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

भाषा = Language (इंग्रजी भाषेत पर्यायी शब्द योजतात.)

Lingua (लॅटिन) या शब्दाचा अर्थ Speech, Tongue असा आहे.

भाषेच्या अभ्यासकांनी भाषा म्हणजे काय, तिचे स्वरूप व वैशिष्ट्ये या दृष्टीने विवेचन करणाऱ्या व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. या व्याख्या भाषा आणि भाषिक व्यवहार व संप्रेषण समजून घेण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. त्या व्याख्या पुढीलप्रमाणे :

१. कृ. पा. कुलकर्णी हे महत्त्वाचे भाषाभ्यासक आहेत. 'मराठी भाषेचा : उद्‌गम आणि विकास' हा ग्रंथ लिहून महत्त्वाचे संशोधन मांडलेले आहे. या ग्रंथामध्ये त्यांनी पुढील व्याख्या नोंदविलेली आहे. ''भाषा हा शब्द भाष् (आवाज उत्पन्न करणे) या धातूपासून आला आहे. भाषा म्हणजे व्यवहारास प्रवृत्त करणाऱ्या सार्थ व अन्वित ध्वनीचा समूह.'' व्यवहार साधन व व्यवहारपूर्तीचे मुख्य उद्दिष्ट भाषेच्या माध्यमातून पूर्ण होते. आत्मप्रकटीकरण (Self-expression) व आत्मनिवेदन (self-communication) या प्रमुख बाबी भाषेच्या केंद्रस्थानी असतात. (पृष्ठ क्र. १-२)

२. भाषा व मराठी संस्कृतीचे विचारवंत व अभ्यासक ना. गो. कालेलकर यांनी आपल्या 'भाषा व संस्कृती' या ग्रंथामध्ये भाषा आणि तिचे स्वरूप-वैशिष्ट्ये याबाबत मौलिक विवेचन केलेले आहे. त्यांनी भाषेची व्याख्या करताना म्हटले आहे, ''भाषा म्हणजे मूळ आशयाशी कार्यकारण संबंध नसलेल्या ध्वनिसंकेतांनी बनविलेली समाजव्यवहाराला साह्यभूत अशी भाषा ही एक पद्धती आहे.'' (भाषा आणि संस्कृती १९६९, पृष्ठ क्र. ८) अशा स्वरूपात भाषेच्या व्याख्येचे महत्त्वपूर्ण विवेचन केलेले आहे.

३. श्री. न. गजेंद्रगडकर यंनी आपल्या 'भाषा आणि भाषाशास्त्र' या भाषाविषयक ग्रंथामध्ये व्याख्या करताना म्हटले आहे, ''यादृच्छिक ध्वनिसंकेतावर आधारलेली, समाजव्यवहाराला साह्यभूत अशी पद्धती म्हणजे भाषा.'' (भाषा आणि भाषाशास्त्र १९९१, पृष्ठ क्र. १०८)



Scanned with OKEN Scanner

४. ''भाषा ही एक सहजक्रिया आहे. तिचा आपणास इतका परिचय असतो की, भाषेचा स्वतंत्र विचार करण्याचा व अभ्यास करण्याचा विषय आहे. याची जाणीव नसते. त्याचबरोबर भाषा ही अर्जित वस्तू आहे. काही ध्वनी निर्माण करता येणे ही गोष्ट सहज असली तरी आशय प्रकट करणारे विधान करता येणे म्हणजे बेलता येणे ही माणसाने मिळविलेली म्हणजे अर्जित वस्तू आहे.'' (अभिनव भाषाविज्ञान : गं. ना. जोगळेकर, पृ. क्र. २-३)

''भाषा बोलली जात नसून ती एक संभाव्य अवस्था असते. जेव्हा भाषेचे ध्वनीत रूपांतर होते तेव्हा ती भाषा राहत नाही, तर भाषण होते. भाषण ही व्यक्तिगत क्रिया असते. याउलट भाषा ही व्यक्तिनिरपेक्ष गोष्ट आहे. ती व्यक्तीनिरपेक्ष असली तरी संपूर्ण समाजाची मालमत्ता या अर्थी एक समाजसापेक्ष अशी सामाजिक संस्था असते. (भाषाविज्ञान आणि मराठी : अनिल (डॉ.) गवळी, पृष्ठ क्र. १६-१७)

भाषेच्या वरील व्याख्यांचा सूक्ष्मपणे अभ्यास केल्यानंतर भाषेच्या स्वरूप, संकल्पना आणि वैशिष्ट्यांवर वरील सर्व अभ्यासक भाष्य करताना दिसतात. त्याचबरोबर समाजव्यवहार पार पाडण्यासाठी हे ध्वनिसंकेत आशयधारण करतात. हे त्यांनी निसंदिग्धपणे नोंदविलेले आहे. हाच आशय अधिक स्पष्ट करणाऱ्या पुढील पाश्चिमात्य भाषाभ्यासकांच्या व्याख्यांचा विचार करूया. त्या अशा,

''कल्पना, भावना आणि इच्छा दुसऱ्याला सांगण्याचे, स्वतःच्या इच्छेवर अवलंबून असणारे, मानवी साधन म्हणजे भाषा'' - एडवर्ड सपीर.

''ध्वनी व अर्थ यात सांगड घालण्याच्या चिन्हांची व्यवस्था म्हणजे भाषा होय.''- फेर्दिनां-द-स्योस्यूर.

भाषा संकेतबद्ध असून चिन्हव्यवस्था आहे. भाषेतील चिन्हांना स्वतःचा अर्थ नसतो. हा अर्थ त्यांना समाज देत असतो. मानव ज्या वास्तूत राहतो त्या वास्तूला 'घर' म्हणतात. तर इंग्रजीमध्ये त्यास 'हाऊस' म्हटले जाते. एकाच वस्तूसाठी भिन्न भाषेत भिन्न शब्द आढळतात. याचाच अर्थ प्रत्येक भाषा समूहाने आपल्या व्यवहारासाठी वस्तूंना आपआपल्या परीने नावे दिलेली आहेत. काही वेळा एकाच भाषेत एकाच वस्तूला भिन्न-भिन्न नावे असतात उदाहरणार्थ, कोल्हापूर परिसरात पावसाळ्यात डोक्यावर घेतात त्यास 'इरलं' म्हणतात. तर चंदगड परिसरात त्यास 'गोख' म्हणतात. याचा अर्थ त्या-त्या परिसरातील समूहाने आपल्या व्यवहारासाठी स्वतःचे अर्थसंकेत दिलेले आहेत.

**भाषेचे स्वरूप**

भाषेच्या व्याख्यांचा तपशीलवार विचार केल्यानंतर भाषेचे पैलू समजण्यास मदत होईल. याच आधारे भाषेचे स्वरूप स्पष्ट करण्यास साह्य होईल. भाषा ही मानवाची सामाजिक संख्या असून, ती मानवाची अद्वितीय निर्मिती आहे. आज जगभरामध्ये सुमारे सात हजार पेक्षा जास्त भाषा व्यवहारामध्ये बोलल्या जातात. यापैकी सुमारे १६५० भाषा केवळ भारतामध्ये व्यवहारात बोलल्या जातात. मानवी जीवनाचे सर्व अंगे भाषेने व्यापलेली आहेत. भाषा मानवी भावभावना शब्दरूप करून संवाद साधणारे महत्त्वाचे साधन



Scanned with OKEN Scanner

आहे. मानव समाजशील प्राणी असल्यामुळे त्यास भाषेची आणि भाषेच्या अस्तित्वासाठी समाजाची गरज आहे. मानवी समाजाच्या प्रगतीसाठी व अस्तित्वासाठी भाषा महत्त्वाची वा गरजेची आहे. या बाबीचा विस्तृत विचार पुढील काही महत्त्वाच्या मुद्यांच्या आधारे करता येईल.

**१. भाषा : समाजव्यवहाराचे माध्यम**

मानव समाजशील प्राणी आहे. जीवनामध्ये असंख्य गोष्टीसाठी तो परस्परावर अवलंबून असतो. स्वतःच्या गरजा स्वतः पूर्ण करण्याचे सामर्थ्य या विश्वात एकमेव माणसामध्ये नसते. तर त्यासाठी परस्परांची गरज असते. त्याचबरोबर समूहाने राहण्यासाठी भाषा महत्त्वाची असते. कारण समूहाने राहणे ही मानवाची नैसर्गिक गरजात्मक प्रेरणा असते. यातूनच समाजसंस्थेची निर्मिती झाली.

समाजनिर्मिती, संघटनासाठी भाषा महत्त्वाची असते. समाजसंक्रमणाची प्रक्रिया भाषेमुळे शक्य असते. समाजजीवनात असंख्य गोष्टीसाठी आविष्कृत व्हावे लागते. जीवनातील मानवी सर्व संक्रमण समजून घेण्यासाठी भाषा हेच एकमेव साधन आहे. आपल्या संस्कृतीतील श्रद्धा, परंपरा, रूढी, चालीरिती यांचे संक्रमण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे, एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात आणि विचार, भावनांची देवाण-घेवाण सतत भाषेमुळे घडत असते. आपण मिळविलेल्या माहिती, ज्ञानाचे आणि संस्कृतीचे संचित पुढील पिढीकडे संक्रमणाचे कार्य भाषा माध्यमानेच शक्य असते. यातून भाषा ही समाजव्यवहाराचे माध्यम असल्याचे स्पष्ट होते.

**२. ध्वनिमाध्यमता**

भाषा ही मानव निर्मित ध्वनीची सृजनशील व्यवस्था आहे. ध्वनी हे भाषेचे माध्यम असून या माध्यमातून आशयाची अभिव्यक्ती हेच भाषेचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. ध्वनी आशयपूर्ण असतात त्याचप्रमाणे संकेतबद्ध चिन्ह व्यवस्थाही असते. भाषेला प्राप्त झालेला अर्थ समाजाने बहाल केलेला असतो. समाजाला ही संकेतचिन्ह व्यवस्था मान्य असते. म्हणजेच प्रत्येक समाजाची भाषा भिन्न असल्यास त्यांची त्यांची संकेत व्यवस्था असते. भाषेचे माध्यम ध्वनी असल्यामुळे भाषा संप्रेषणव्यवहारासाठी महत्त्वाचे साधन असते. कारण ध्वनी विविध गुणांनी संपन्न आहेत. ते सतत मानवासोबत, मानवी चिंतन-विचार यांच्या अधीन असतात. भिंत, अंधार, अंतर यासारख्या नैसर्गिक अडचणींना ध्वनी पार करतात. ध्वनी म्हणजे वायूलहरी होत. त्यामुळे संप्रेषण जलद गतीने घडत असते. कमीत-कमी श्रमामध्ये सहज उपलब्ध होणारे ध्वनी हे भाषेचे माध्यम असल्यामुळे भाषा वैविध्यपूर्ण वा वैशिष्ट्यपूर्ण ठरलेली आहे.

**३. संकेतबद्धता**

भाषा ध्वनिमय संकेताचा आशयपूर्ण व्यवहार असतो. ती ध्वनिसंकेतावर आधारलेली पद्धती आहे. भाषेतील ध्वनिसंकेतांना समाज मान्यता असते. ध्वनीच्या विशिष्ट मांडणीतून भाषा व्यवहारामध्ये संकेत निर्मिती झाली. हे संकेत प्रत्येक समाजानुसार त्यांच्या भाषाव्यवहारामध्ये स्वतंत्रता दिसते. मराठी भाषेमध्ये ज्या प्राण्याला 'कुत्रा' म्हणतात. त्या प्राण्यास हिंदी भाषेमध्ये 'कुत्ता' म्हणतात. संस्कृत भाषा व्यवहारात



Scanned with OKEN Scanner


'श्वान' आणि इंग्रजी भाषा व्यवहारात 'डॉग' म्हटले जाते. या उदाहरणातील सर्व भाषेमध्ये ध्वनी भिन्न-भिन्न आहेत. परंतु प्रत्येक भाषेतील ध्वनीतून व्यक्त होणारा संकेत अर्थ एक विशिष्ट प्राणी असाच आहे. प्रत्येक भाषा व्यवहारामध्ये या विशिष्ट (कुत्रा) प्राण्याला कोणत्या ध्वनिसमुच्चयाने ओळखायचे हे ठरलेले आहे. याबाबत उत्तर देता येत नाही. ही त्या-त्या भाषेची भाषिक पद्धती आहे. असाच निष्कर्ष नोंदवावा लागेल. रस्त्यावर लावण्यात येणारे पिवळे, लाल दिवे विशिष्ट अर्थपूर्ण संकेतच देत असतात. या स्वरूपाच्या संकेताना मर्यादा असतात. मात्र भाषेतील संकेतबद्धता हे भाषाव्यवहाराचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. अशा ध्वनिसंकेतबद्धतेस सोस्यूर या भाषाअभ्यासकाने बुद्धिबळाच्या खेळाचे उदाहरण दिले आहे.

### ४. प्रतिकात्मकता

भाषेत योजिलेल्या ध्वनिसंकेतांना त्या-त्या समाजाने ठरविलेले संकेत असतात. यादृच्छिकतेच्या तत्त्वानुसार भाषेत ध्वनिसंकेत योजले जातात. ध्वनिमुळे निर्माण होणारी प्रतिकात्मकता ही महत्त्वाची असते. ज्ञानग्रहण, समज या प्रतिकात्मकतेमुळे शक्य होते. मानव ध्वनिसंकेताबरोबरच व्यवहारासाठी इतर काही संकेत वापरतो; यातूनही प्रतिकात्मकता दिसून येते. या भाषेतर संकेतानाही मानवाची एक विशिष्ट भाषा म्हणूनच ओळखले जाते. उदाहरणार्थ दोन बोटे 'व्ही' आकारात करणे म्हणजे विजय दर्शविणे, तर अंगठा जमिनीकडे करणे म्हणजे पराजय दर्शविणे. या संकेतानाही मानवी भाषा म्हणूनच ओळखले जाते. त्याचबरोबर दात-ओठ खाणे-रागविणे, डोके खाजविणे-विचार करणे, देवापुढे हात जोडणे-शरण जाणे इत्यादी प्रतिकात्मक भाषेचा व्यवहारात विचार केला जातो.

### ५. भाषा : एक प्रक्रियात्मक पद्धती

भाषिक व्यवहारामध्ये सुटेसुटे ध्वनी योजून उपयोग होत नाही. तर ध्वनींच्या समुच्चयांना अर्थ असतो. हा समुच्चयही अर्थदृष्ट्या महत्त्वाचा असतो. ध्वनींचा समुच्चय आणि आशय यांचा संबंध यादृच्छिक असतो. भाषा व्यवहारात योजताना एक पद्धती वापरली जाते. ध्वनिसमुच्चयाचे अर्थ भाषा वापरणाऱ्या प्रत्येक भाषिकाला ज्ञात असतात. त्यातूनच भाषेतील ध्वनीचा स्वीकार श्रोत्याकडून घडत असतो. भाषाव्यवहाराची प्रक्रिया दर्शविणारी आकृती पुढीलप्रमाणे -






Scanned with OKEN Scanner

भाषाव्यवहाराच्या वरील उदाहरणामध्ये संदेशक आणि ग्रहणकर्ता या दोघांनाही भाषेतील अर्थसंकेत ज्ञात असतात. तेव्हाच आशयात्मक संदेशन घडून येते.

**६. भाषा : मानवी बुद्धीचा आविष्कार**

मानव अन्य प्राण्यापेक्षा अधिक बुद्धिमान आणि विचार करणारा प्राणी आहे. त्याने आपल्या या समार्थ्याने विविध शोध लावले आहेत. भाषानिर्मिती, भाषेतील संकेतव्यवस्था आणि भाषिक आशय व्यवहार ही मानवी बुद्धीचा आविष्कार आहे. मानवेतर अन्य प्राण्यामध्ये या स्वरूपाचा भाषिक व्यवहार विकसित झालेला नाही. मानवाने सातत्याने नाविन्याचा आणि सुलभतेचा ध्यास घेतलेला आहे. या ध्यासामागे नैसर्गिक प्रेरणा असल्याचे जाणवते.

मानवी जीवनामध्ये संप्रेषणासाठी भाषिक व्यवस्था अस्तित्वात आलेली असल्यामुळे, मानव हाच भाषेचा आविष्कारकर्ता आहे.

● **सी. एफ. हॉकेट यांनी सांगितलेली भाषेची सात वैशिष्ट्ये**

**१. द्विस्तरीय संरचना** (दुहेरीपणा-Duality)

मौखिक पद्धतीने उच्चारल्या जाणाऱ्या असंख्य ध्वनींपैकी काही मोजके ध्वनी भाषेत मूलध्वनी म्हणून योजले जातात. हे मूलध्वनी म्हणजेच त्या त्या भाषेची अक्षरे होय. ही वर्ण अथवा अक्षरे भाषेनुसार भिन्न-भिन्न आणि कमी-अधिक असल्याचे पहावयास मिळते. या मूळ ध्वनींची संख्या जगभरातील भाषांत साधारणतः ३० ते ७० एवढी असल्याचे दिसते. या मूळ ध्वनींची जुळवाजुळव करून अर्थघटक म्हणजेच शब्दाची निर्मिती केली जाते. हे मूलध्वनी स्वतंत्र असतात तेव्हा त्यांना कोणताही अर्थ नसतो. उदाहरणार्थ न, अ, क, आ इत्यादी मूलध्वनीची न्+आ+क्+अ अशी जुळणी केल्यास 'नाक' असा अर्थ प्राप्त होतो. हा अर्थ मानवी शरीराचा अवयव या अर्थाने येत असतो. त्यामुळे तो आशयाच्या दृष्टीने अर्थपूर्ण ठरतो.

मानवी भाषाव्यवहारातील मूळध्वनींचा मर्यादित साठा हा भाषेतील महत्त्वाचा स्तर व त्याची अर्थपूर्ण, नियमबद्ध जुळणी करून संप्रेषणासाठी यथार्थ रूप धारण करणे हा भाषिक संरचनेचा दुसरा स्तर होय. ही द्विस्तरीय संरचना हे भाषेचे मूलभूत आणि महत्त्वाचे वैशिष्ट्य असते. तात्पर्य - भाषेतील मूलध्वनी आणि त्या मूलध्वनीची अर्थपूर्ण संरचनेतून आशयपूर्ण अर्थनिर्मिती घडते, त्या स्तरीय रचनेस द्विस्तरीय भाषा संरचना असे संबोधतात.

**२. भाषा निर्मितीक्षम असते** (Productivity) : भाषानिर्मितीक्षम आहे. भाषेतील ध्वनीने अथवा सुट्या सुट्या शब्दांनी किंवा भाषेसाठी निश्चित करण्यात आलेल्या मूलध्वनीच्या उच्चाराने भाषिक व्यवहार घडत नाही. यासाठी भाषेमध्ये ध्वनीच्या, शब्दांच्या जुळणीला अनन्यसाधारण महत्त्व असते. प्रत्येक भाषेमध्ये निवडक ध्वनींचा वापर करून हजारो शब्द, वाक्यांची निर्मिती करता येणे ही भाषेची निर्मितीक्षमता आहे. नवीन वाक्य निर्माण करण्याची भाषिक क्षमता मानवाजवळ आहे. पूर्वी केव्हाही संभाषणात वा श्रवणात न आलेलेही वाक्य समजणे यामागील कारण म्हणजे भाषेची नियमव्यवस्था, शब्दसंग्रह प्रत्येक



Scanned with OKEN Scanner

भाषिकाला अवगत झालेली असते. नियमव्यवस्था भाषेच्या संदर्भात निर्मितीक्षम असते. त्यामुळेच एक वाक्य समजले की भाषेच्या अनुषंगाने विविध प्रकारची वाक्ये निर्माण करता येतात. एकाच विषयावरील व्याख्यान अथवा पुस्तक हे भाषेच्या निर्मितीक्षमतेचे महत्त्वाचे उदाहरण आहे.

भाषेच्या दृष्टीने लहान मुलाने एका वाक्याच्या आधारे निर्माण केलेली विविध वाक्य भाषा निर्मितीक्षम असल्याचीच उदाहरणे आहेत. उदा. लहान मुलाला 'खाऊ दे' असे वाक्य सांगितले तर ते मूल बाहुली दे, खाऊ दे, पाणी दे, खेळणं दे या स्वरूपाची असंख्य वाक्ये बनविताना दिसते. या संदर्भात आणखी उदाहरणे पाहणे भाषेच्या निर्मितीक्षमतेच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरेल.

१. मी खेळत आहे.

२. मी शाळेत जात आहे.

३. मी बागेत जात आहे.

४. मी गावाला जात आहे.

५. मी उद्या कोल्हापूरला फिरायला जात आहे.

६. मी कामानिमित्त गावात जात आहे.

वरील सर्व वाक्य एकाच पद्धतीने तयार झालेली आहेत. या वाक्यामधून क्रियेसंदर्भातील पहिले वाक्य येते. पुढील सर्व वाक्य क्रियेबद्दलच येताना दिसतात. या स्वरूपाची हजारो वाक्य निर्माण करण्याची क्षमता भाषेमध्ये आहे. खेळपट्टीवर खेळल्या गेलेल्या सामन्याचे वर्णन प्रत्येक खेळाडू, प्रेषक यांच्यादृष्टीने वर्णन स्वतःच्या पद्धतीने वेगवेगळे असेल. मात्र खेळाचा सामना ही घटना एकच असेल. यावरून भाषेच्या निर्मितीक्षमतेची कल्पना अधिक स्पष्ट होईल.

### ३. भाषेची यादृच्छिकता (Arbidrariness)

जगभरातील सर्व भाषामध्ये यादृच्छिकता हे तत्त्व सामावलेले असते. यामुळेच भाषेत होणारी ध्वनीपरिवर्तने भाषिकांच्या आकलनक्षमतेच्या आवाक्यात राहतात. भाषेत होणारे परिवर्तन यादृच्छिकतेमुळेच शक्य असते. ध्वनी तेच राहतात परंतु शब्दाचे अर्थ बदलतात काही वेळा ध्वनींमध्ये परिवर्तन घडून येते परंतु अर्थ किंवा सूचक आशय कायम राहतो. मानवेतर प्राण्याच्या भाषेला या स्वरूपाची यादृच्छिकता प्राप्त झालेली नसते. उदा. मधमाशा आपल्या हालचालीतून वा नृत्यातून विशिष्ट संदेशवहन करतात. या हालचालींना विशिष्ट एकमेव अर्थ असतो. मानवाच्या भाषेला मात्र ही मर्यादा नसते. त्यांची भाषा एकाच वस्तूसाठी वेगवेगळ्या भाषेत भिन्नभिन्न शब्द योजीत असते. कावकाव व नादानुकारी शब्द सारखेच असते तर 'को' आणि कावकाव यात साम्य आढळले असते. भाषा शिकताना घ-घर, ग-गवतातील अथवा म-मक्यातील, अ-अननसाचा ही केवळ शिकण्याची पद्धत आहे. परंतु भाषा हे शिकण्याच्या पूर्व पातळीवरच असते. अर्थाअर्थी 'ग', 'अ', 'म' यांचा काही संबंध नसतो. प्रत्येक भाषा ही पूर्णतः स्वतंत्रपणे विकास पावलेली असते. यामुळेच ती स्वतंत्र असते.



Scanned with OKEN Scanner

भाषा-लेखन व शिकण्यासाठी साचेबद्ध असते. पण आकलनासाठी स्वतंत्र असते. म्हणूनच ती स्वतंत्रपणे शिकावी लागते. शब्दाच्या माध्यमातून सूचित होणारा आशय आणि तो शब्द यांच्यामध्ये कोणताही कार्यकारणभावात्मक संबंध नसतो. म्हणजेच शब्द आणि त्या शब्दामुळे प्रतीत होणारा आशय पूर्णपणे यादृच्छिक असतो.

**४. भाषेतील अदलाबदलाची शक्यता** (Inter Changeability)

भाषेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे समाजातील प्रत्येक वक्ता-श्रोता या भूमिकांमध्ये वावरत असतो. दोन व्यक्तीतील दीर्घ संवाद वक्ता-श्रोता या भूमिकेतून घडत असतो. गप्पांच्या ओघात दोघेही क्रमाने बोलतात. क्रमाने ऐकतात. मानवेतर प्राण्यामध्ये नर-मादीतील एकच संदेश भिन्न-भिन्न असतो. परंतु मानवी भाषांमध्ये असे पहावयास मिळत नाही. कोणताही संदेश कोणासही वापरता येतो. बऱ्याच वेळा ग्रामीण भागामध्ये स्त्रिया बोलताना 'करते' असे बोलण्याऐवजी 'करतो' असे बोलतात. त्यावेळी स्त्रीलिंगाचा विचार न करता पुरुषलिंगी शब्दप्रयोग करतात. भाषेमध्ये बोलत असताना आपण स्वतःचे बोलणे ऐकतो. बोलताना चूक झाल्यास बोलण्यातील चूक सुधारू शकतो. असे मानवेतर भाषामध्ये पहावयास मिळत नाही. यामुळे भाषा विकसित व समृद्ध होत आहे.

मानवी भाषा शिकण्याची-समजून घेण्याची प्रक्रिया भाषेतील अदलाबदल या वैशिष्ट्यामुळे सुलभ होते. भाषेच्या या वैशिष्ट्यामुळे भाषा वृद्धींगत, समृद्ध होताना दिसते. संकेतीकरणाचे व विसंकेतीकरणाचे नियम वक्ता व श्रोता यांच्या बाबतीत एकच असावयास हवेत. नियंत्रकाप्रमाणे भाषा हे कार्य करत असते. मानवेतर प्राण्यामध्ये संदेशन साधारणतः एकाच दिशेने होत असते. गायीचे वासरू ओरडले तर वात्सल्याने घोडा चाटत नाही.

**५. भाषेची विशिष्टता** (Specialization)

भाषेतील संदेशवाहक प्रणालीची विशिष्टता संदेशसूचनांची प्रक्रिया आणि सूचित केलेला संदेश यामधील संबंधाच्या स्वरूपावर अवलंबून असते. मानवी भाषिक संप्रेषण व्यवहारामध्ये शारीरिक पातळीवरील हालचालींचा उपयोग करून दिला जाणारा संदेश आणि ध्वनिसंकेताचा वापर करून दिला जाणारा संदेश यामध्ये फरक करता येतो. क्रिकेट खेळामध्ये हम्पायरने एक बोट वर करणे आणि खेळाडूने बाद झाल्याचा संदेश संपादन करून मैदान सोडणे या संदेशामध्ये कार्यकारण संबंधाचे नाते आहे. परंतु आपण रस्त्यावरून प्रवास करताना आपणास पुढे अपघात झाला असल्याने रस्ता बंद असल्याचे सांगितले, तर आपण रस्ता बदलतो (प्रत्यक्ष न पाहताही अपघात झालेला आहे असे समजतो.) येथे प्रत्यक्ष घटना न पाहता चिन्ह व्यवस्थेचा अर्थ उपयोग करून योग्य कार्य साधतो. बैल मारेल बाहेर जाऊ नको, असे लहान मुलास सांगताच लहान मूल बैल न पाहताच थांबते त्यास बैल म्हणजे काहीतरी वाईट असल्याचा संदेश भाषेतून मिळतो. या क्रियेतील संकेत विशिष्टपणे बनलेले आहेत.



Scanned with OKEN Scanner

### ६. **स्थलकालातीतता** (Displacement)

स्थळ, काळाची बंधने ओलांडून आशयाचे वहन करण्याचे सामर्थ्य प्रत्येक भाषेमध्ये असते. स्वतःच्या प्रदेशाचा इतिहास, घराण्याची परंपरा, राजकीय स्थित्यंतरे, वर्तमान स्थिती, भविष्यकाळासंदर्भातील अंदाज, मनोदय किंवा पुढचे नियोजन याबाबतीत आपण बोलू शकतो. एखाद्या प्रसंगाशी प्रत्यक्ष संबंध नसताना, तेथे प्रत्यक्ष उपस्थित नसताना त्या घटनेविषयी बोलतो, त्या घटनेविषयी ऐकतो. त्यापासून योग्य तो अर्थबोध घेतो. फूल प्रत्यक्ष न पाहता त्यावर काव्य करतो, त्या फुलावरील कविता समजते. एखाद्या काव्यातून, कथेतून व नाटकातून न पाहिलेल्या, न अनुभवलेल्या घटनेचे वर्णन ऐकतो. काश्मीर, कन्याकुमारी, गया इत्यादी ठिकाणे न पाहताही त्यांची वर्णने आपण वाचतो आणि ती समजूनही घेतो.

छ. शिवाजी महाराज, म. फुले हे महामानव आज हयात नाहीत, त्यांना पाहिलेलेही नाही. पण त्यांचे विचार आस्थेने, श्रद्धेने ऐकतो, सांगतो, वाचतो. त्या घटनाची कल्पितपणे अनुभूती घेतो. याचाच अर्थ आपण स्थळ, काळाची, प्रदेशाची बंधने झुगारून भाषेच्या मदतीने या गोष्टी करतो. ही भाषेची स्थलकालातीतता भाषेचे सामर्थ्यच आहे.

### ७. **सांस्कृतिक संक्रमण** (Cultural Transmission)

व्यक्तीला भाषा मागील पिढीकडून सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेतून मिळते. भाषा अनुवांशिकपणे प्राप्त होत नसली तरी; भाषा शिकण्याची क्षमता अनुवांशिक असतो. या क्षमतेमुळेच प्रत्येक व्यक्ती भाषा आत्मसात करू शकते. भाषा ही मागील पिढीचे संक्रमण संचित असते. सामाजिक संस्कृती, श्रद्धा, परंपरा, रूढी, चालीरीती, ज्ञान इत्यादी बाबी भाषेच्या साहाय्याने संवर्धित केल्या जातात. हा सामाजिक ठेवा पुढील पिढीजात भाषेच्या माध्यमातून प्राप्त होतो. त्या ठेव्यामध्ये व्यक्ती नव्याने भर घालते. ही सांस्कृतिक वाढ भाषेमुळेच घालता येते. समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढल्यामुळे, शिक्षण सर्व स्तरातील लोकांना मिळाल्यामुळे पारंपरिकपणे चालत आलेल्या गोष्टी कालबाह्य झाल्या आहेत. नव्या कल्पना, वैज्ञानिक दृष्टिकोण यामध्ये वाढ झालेली आहे. पुढील पिढीकडे हे संचित संक्रमित होत आहे. हे संक्रमण भाषेमुळेच शक्य आहे. सी. एफ. हॉकेट यांनी सांगितलेली भाषेची ही सात वैशिष्ट्ये सर्व भाषेमध्ये सार्वत्रिक दिसतात. भाषेच्या या महत्त्वाच्या वैशिष्ट्याबरोबरच भाषेची आणखी काही वैशिष्ट्ये दिसून येतात. या वैशिष्ट्यांचा संक्षिप्तपणे विचार करू.

### ८. **भाषा : सामाजिक संस्था**

मानवाच्या व समाजाच्या असंख्य गरजा असतात. या गरजांच्या पूर्तीसाठी सामाजिक संस्था निर्माण झाल्या. समाज टिकून राहणे, समाजाला स्थैर्य लाभणे व समाजामध्ये शिस्त येऊन एक व्यवस्था निर्माण होणे यासाठी समाजअंतर्गत सामाजिक संस्था कार्यरत असतात. कुटुंब, धर्म, विवाह याप्रमाणेच 'भाषा' ही एक सामाजिक संस्था आहे. सामाजिक संस्थेचे स्वरूप समाज सापेक्ष असते. या नियमानुसार भाषेचे स्वरूपही समाजानुसार बदलते.



Scanned with OKEN Scanner

### ९. अर्जित भाषा

भाषा एक सामाजिक संस्था असून ती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीने आत्मसात करावी लागते. ती निसर्गनिर्मित नसून मानवनिर्मित आहे. त्यामुळे भाषा मानवाला अर्जित करावी लागते. भाषा शिकणे ही नैसर्गिक प्रेरणा आहे. मानवी मेंदूमध्ये भाषेच्या ग्रहणासंबंधी जैविक कळ असते. विशिष्ट वयामध्ये सामाजिक संदर्भानुसार ती कार्यरत होते. समाजात कार्यरत असणारी भाषा सततच्या ऐकण्यामुळे आत्मसात होते. याचाच अर्थ भाषा अर्पित नसून अर्जित आहे. समाजात राहिल्याने भाषा शिकली जाते. लहान मुलं आपल्या आई-वडिलांकडून भाषा शिकत असतात.

### १०. भाषेची परिवर्तनशीलता

भाषा सामाजिक संस्था आहे. ती समाजात उदयास येते. विकास पावते. परावर्तित होते. समाज-जीवनातील बदलाबरोबर भाषा बदलत राहते. शिवकाळातील गद्य भाषा, पेशवेकाळातील भाषा, इंग्रजी काळातील भाषा आणि आजची मराठी भाषा यांचा विचार करता भाषेची परिवर्तनशीलता स्पष्टपणे जाणवते. पतीचे नाव न घेणारी, पतीसाठी 'तिकडून येणे झाले नाही' यासारखी भाषा वापरणारी स्त्री आज पतीचे नाव घेते. आरे-तुरेच्या भाषेत बोलते. ही भाषेची परिवर्तनशीलता आहे.

समाजातील बदलाचा भाषेच्या बदलावर परिणाम होत असतो. शिक्षण, सांस्कृतिक बदल, औद्योगिक बदल, नवे शोध, भौतिक साधने इत्यादींचा भाषिक परिवर्तनाशी संबंध असतो. प्रसार माध्यमानी नव्या स्वरूपात भाषिक परिवर्तनास गती दिल्याचे जाणवते. मोबाईलच्या निर्मितीमुळे असंख्य शब्दांची मराठी भाषेमध्ये भर पडलेली आहे. हे भाषेची परिवर्तनशीलतेचेच उदाहरण आहे.

### ११. भाषेची रैखिकता

भाषिक व्यवहार आत्मसात करणे म्हणजे भाषेतील शब्दसंग्रह आत्मसात करणे वा भाषेचे नियम आत्मसात करणे. भाषा वापरामध्ये भाषेचे नियम पाळावे लागतात. भाषा ध्वनीची संरचना असते. यामुळे ध्वनीच्या सानुक्रम रचनेला समाजामध्ये विशिष्ट असे अर्थ असतात. उदा. झ्, आ, ड्, अ या स्वतंत्र ध्वनींना अर्थ नसतो. या ध्वनीची सानुक्रम रचना केल्यास (झ्+आ+ड्+अ) 'झाड' असा अर्थ प्राप्त होतो.

### भाषेचे कार्य

भाषेच्या स्वरूपाचा अभ्यास  हा एका अर्थाने भाषेच्या कार्याचाच अभ्यास असतो. भाषा सामाजिक संस्था असल्यामुळे संदेशवहन, विनिमय आणि संप्रेषण हे भाषेचे कार्य आहे. मानव समाजशील असल्यामुळे तो कळपाने राहात नाही, समूहाने राहतो. परस्पर संबंध, परस्पर सहकार्य, आंतरक्रिया घडणे महत्त्वाचे असते. त्यामुळे सर्व मानवजात परस्परांशी देवाणघेवाण, संपर्क आणि विचारविनिमय करताना दिसते. या संपर्काचे महत्त्वाचे साधन वा माध्यम भाषा आहे. हे भाषेचे कार्य महत्त्वाचे आहे.



Scanned with OKEN Scanner

रोमान याकोबसन याने भाषेच्या कार्याच्या केलेल्या विभाजनामागे एक विचार आहे. भाषिक संदेशनाच्या प्रक्रियेमध्ये किंवा चिन्ह वापरामध्ये सहा मूलघटक असतात. त्यांना मिळणाऱ्या महत्त्वानुसार भाषिक चिन्हे सहा मुलभूत कार्य करतात. असा साधार विचार आहे. भाषिक चिन्ह व्यापारातील परिसर किंवा संदर्भ, संदेश, प्रेषक, ग्रहणकर्ता, संपर्क, माध्यम असे सहा मूलभूत घटक रोमान याकोबसन याने सांगितलेले आहेत. संदेशनाच्या प्रत्येक क्रियेमध्ये हे घटक असतात. या घटकांपैकी ज्या घटकाला प्रत्यक्ष संदेशनाचे प्राधान्य मिळेल त्यानुसार विशिष्ट प्रकारचे संदेशनात्मक कार्य घडून येईल. रोमान याकोबसन याने भाषेच्या संरचनेच्या अंगाने विभाजन केलेले आहे. भाषेच्या सहा मुलभूत घटकानुसार भाषेची सहा कार्ये पुढीलप्रमाणे -

परिसर / संदर्भ (context)

संदर्भ (Message)

प्रेषक (Sender) / ग्रहणकर्ता (Receiver)

संपर्क (Contact)

माध्यम (Code)

वरील मूलघटकांनुसार भाषेच्या कार्याची विभागणी त्यांनी खालीलप्रमाणे केली आहे.

संदर्भनिष्ठ/निर्देशात्म (Referential)

काव्यात्म/सौंदर्यात्म (Poetic / Aestetic)

आविष्कारात्मक (Emotive / Expressive) परिणामनिष्ठ (Conative / Affective)

संपर्कनिष्ठ (Phentic)

भाषाविषयक/चिन्हव्यवस्थाविषयक (Metalingual)

**१. संदर्भनिष्ठ किंवा निर्देशात्मक कार्य**

'संदेशन' करणारी व्यक्ती कोणत्या संदर्भाने बोलते हे या संभाषणात महत्त्वाचे आहे. दोन व्यक्तीतील संभाषण हे त्या दोघापुरते मर्यादित संभाषण नसते. त्यांच्या बोलण्यामध्ये संदर्भ कशाचा आहे हे महत्त्वाचे असते. शेतकरी संभाषण करताना; त्यांच्या बोलण्यात शेती, पीक-पाणी, हवामान, मजूर-रोजगार, अवजारे-वाहने इत्यादीचे तर दोन खेळाडू बोलतात तेव्हा त्यांच्या बोलण्यात खेळ, मैदान, मार्गदर्शक, प्रतिस्पर्धक, आहार, डावपेच इत्यादी संदर्भ येतात.

**२. काव्यात्मक वा सौंदर्यात्मक कार्य**

या वैशिष्ट्यामध्ये संदेश हा घटक केंद्रस्थानी असतो. हा घटक येथे स्वयंमेव संदेशनाचे उद्दिष्ट बनतो. त्याला इतर कोणतीही उद्दिष्टे नसतात. इतर कोणत्याही प्रकारे तोच संदेश या कार्यामध्ये पाठविता



Scanned with OKEN Scanner

येत नाही. भाषेच्या या कार्यात आशयाला व संदेशाला वेगळे वा सुटे असे महत्त्व नसते. जो आशय तोच संदेश असतो.

**३. भाषेचे आविष्कारात्मक कार्य**

व्यक्तीचे व्यक्त होणे म्हणजे आविष्कार होय. हे व्यक्त होण्यासाठी भाषा हेच माध्यम असते. साहित्यातील आविष्कार वा काव्यात्मक सौंदर्य या अर्थाने हे वैशिष्ट्य येत नसून मानवाला बोलावे असे नैसर्गिकपणे वाटते. यासाठी याकोबसन याने ही संकल्पना मांडलेली आहे. तो म्हणतो, मानव आपल्या मनातील भाव-भावना, गुपिते, सुख-दुःखे इतरांना सांगण्याची प्रेरणा असते ती नैसर्गिक आहे. यालाच भाषेतून व्यक्त केले जाते. या क्रियेला भाषेचे आविष्कारात्मक कार्य म्हणतात.

**४. भाषेचे परिणामनिष्ठ कार्य**

श्रोत्यावर (ग्रहणकर्त्यावर) भाषेचे हे कार्य विशिष्ट परिणाम करते. डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या व्याख्यानातून संस्कृत साहित्याचे येणारे संदर्भ श्रोत्यांच्या मनावर प्राचीन साहित्याचे संदर्भ, वाङ्मयीन श्रेष्ठता, काव्यात्मकता आणि मांडणीतील शैलीचा मानसिक पातळीवर त्या-त्या कालखंडाशी एकरूप होतात. त्या-त्या काळाचे एक कल्पनारम्य दृश्य श्रोत्यांच्या मनःपटलावर तयार होते. हा परिणाम भाषेचा असतो. भाषा, स्थळ, काळ, प्रदेशाच्या सीमा ओलांडते. चित्रपट, नाटक, पुस्तके इत्यादींमधून होणारे भाषेचे कार्य महत्त्वाचे असते.

**५. भाषेचे संपर्कनिष्ठ कार्य**

प्रेषक व ग्रहणकर्ता यांच्यातील संपर्क वाढविणे किंवा कमी होणे ही प्रक्रिया घडते. उदाहरणार्थ, वर्गातील नवीन मित्राबरोबर ओळख काढून संपर्क वाढविणे. कोणते गाव, नाव काय, यापूर्वी कुठे होता या वाक्यातून ओळख वाढविणे हाच उद्देश असतो. हे कार्य भाषेमुळे घडत असते, भाषा संपर्कनिष्ठ असते. फार कमी बोलून संपर्कही कमी करता येतो.

**६. भाषाविषयक वा अतिभाषात्म कार्य**

ज्ञान मिळविणे, देणे, वाढवणे, जतन करणे, ही विविध कार्ये भाषेच्या माध्यमाने चालतात भाषेमुळे शिकण्याची प्रक्रिया घडते. कोणत्याही ज्ञानशाखेतील ज्ञान भाषेच्या माध्यमानेच चालते. जतन केले जाते, वाढविले जाते, तसेच भाषेच्या संदर्भातील विचारही भाषेमुळेच मांडता येतात. व्याकरण, भाषाशास्त्र, भाषेची संरचना, भाषिक व्यवहार इत्यादी घटकांची चर्चा भाषेमुळेच शक्य असते. या कार्यास अतिभाषात्म असे म्हटले आहे.

**शब्दार्थ व टिपा**

**मूलध्वनी** : भाषेत योजले जाणारे ध्वनी, एखाद्या भाषेचे मूलध्वनी, त्या भाषेची वर्णमाला म्हणून ओळखले जातात.



Scanned with OKEN Scanner

**संप्रेषणक्षमता** : भाषा प्रत्यक्ष वापरण्याचे कौशल्य.

**भाषाक्षमता** : जन्माला आलेल्या मुलाला भाषाग्रहण करण्याची उपजत असलेली क्षमता.

**भाषाव्यवस्था** : नियमबद्ध अशी भाषेची रचना.

**भाषाव्यवहार** : भाषेचा प्रत्यक्ष वापर

**निर्मितीक्षमता** : नवीन निर्माण करण्याची ताकद

**संभाषक** : बोलणारा

**प्रेषक** : बोलणारा

**सी. एफ. हॉकेट** (अमेरिका) A course in Modern Linguistics हा ग्रंथ (१९५८)

## २.१ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न आणि उत्तरे

**प्रश्न : योग्य पर्याय निवडा.**

१. भाषेचे माध्यम कोणते आहे ?

(अ) ध्वनी (ब) आवाज (क) अक्षरे (ड) शब्द

२. मूलध्वनी म्हणजे काय ?

(अ) माकडाचे ध्वनी (ब) ऐकू न येणारे ध्वनी

(क) भाषिक ध्वनी (ड) निसर्ग ध्वनी

३. भाषेमध्ये मूलध्वनींची संख्या किती असते ?

(अ) असंख्य (ब) अमर्यादित

(क) मर्यादित (ड) अपेक्षित

४. सी. एफ. हॉकेट यांनी भाषेची किती वैशिष्ट्ये सांगितली आहेत ?

(अ) सहा (ब) सात (क) आठ (ड) नऊ

**उत्तरे** : १. ध्वनी २. भाषिक ध्वनी ३. मर्यादित ४. सात



Scanned with OKEN Scanner

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. भाषा म्हणजे काय ते सांगून भाषेची वैशिष्ट्ये सविस्तर लिहा.

२. सी. एफ. हॉकेट यांनी सांगितलेली भाषेची वैशिष्ट्ये सांगा.

३. भाषेच्या विविध व्याख्या सांगून भाषेची कार्ये स्पष्ट करा.

**प्रश्न : लघुतरी प्रश्न**

१. भाषेची कार्ये लिहा.

२. मानवेतर संप्रेषणाचे स्वरूप स्पष्ट करा.

३. भाषेच्या तीन व्याख्या सांगा.

४. भाषा एक सामाजिक संस्था आहे उदाहरणासह स्पष्ट करा.

**प्रश्न : टिपा लिहा.**

१. भाषेबद्दलचे दृष्टिकोण

२. भाषा : एक सामाजिक संस्था

३. भाषिक संप्रेषण

४. भाषेची परिवर्तनशीलता

५. भाषा एक प्रक्रियात्मक पद्धती

६. भाषिक प्रतिकात्मकता

**संदर्भ वाचन**

१. कालेकर ना. गो. (१९६२) भाषा आणि संस्कृती, मौज प्रकाशन, मुंबई.

२. कालेलकर ना. गो. (१९६४) भाषा इतिहास आणि भूगोल, मौज प्रकाशन, मुंबई.

३. केळकर अशोक (१९८३), वैखरी, मॅजिस्टिक प्रकाशन, मुंबई.

४. मालशे डॉ. मिलिंद (१९९८), आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन, लोकवाङ्मयगृह, मुंबई.

५. गवळी (डॉ.) अनिल (२००९) : भाषाविज्ञान आणि मराठी भाषा, हिरण्यकेशी प्रकाशन, कोल्हापूर.

*-*-*



Scanned with OKEN Scanner